----------------

Media Coverage – ‘Khelghar’ activities at Keshavnagar, Pune

# मुलांसाठी खेळघर उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

हडपसर : महात्मा फुले वस्तीतील ‘मुलांसाठी खेळघर’ हा उपक्रम सुरु करण्यात आला.

भारत फोर्जच्या सामाजिक बांधिलकी विभागप्रमुख लीना देशपांडे यांच्या मार्गदर्शनाने वय वर्षे ५ ते ११ या मुलामुलींसाठी या उपक्रमाची सुरुवात केली आहे. दररोज सायंकाळी ६ ते ७.३० या वेळेत शाळा सुटल्यावर वर्ग घेतले जात आहेत. यासारखे उपक्रम केशवनगर या भागातदेखील सुरु केले आहेत. ज्ञानप्रबोधिनी शैक्षणिक उपक्रम संशोधिका व स्थानिक कार्यकर्ते, शिक्षिका यांच्या मदतीने प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यात आली.

या प्रशिक्षणाचा हेतू विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकसन होऊन त्यांच्यातील अंगभूत कौशल्यामध्ये वाढ व्हावी, असा आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन राहुल अरोळे, सुजाता होनप यांच्या हस्ते झाले. ज्ञान प्रबोधिनी प्रज्ञा विकास व खेळघर कार्यक्रमाची माहिती प्रा. ओंकार बाणाईत यांनी दिली.

खेळघरातील सहभागी मुलांना साहित्य व खाऊचे वाटप राहुल अरोळे व सुजाता होनप यांच्या हस्ते करण्यात आले.